# विनोद सम्राट

# चार्ली चॅप्लीन

म.ग्रं.सं., वाचनालय शाखा, ठाणे.
विषय : बा.वा
दा.क्र.: ४४००



BVBK-0404400
BVBK-0404400

वैशाली प्रकाशन

राजि.दा.नं १०८४९८/वाचनालय

बा.वा.
४४००
१४/५/०८

# विनोद सम्राट चार्ली चॅप्लीन

मं. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बालवाङमय विभाग
दा. क्र. ४४०० दिनांक. १४/५/०८...
विषय..बा.वा. ........क्र.....

BVBK-0404400
BVBK-0404400

: लेखिका :
डॉ.सौ. शशिकला जयंत कर्डिले
५/८७, शुभंकरोती बंगला,
विद्याविहार कॉलनी, नाशिक रोड - ४२२ १०१

| | | |
|---|---|---|
| प्रथम आवृत्ती | : | |
| हक्क | : | |
| प्रकाशक | : | वैशाली प्रकाशन |
| रजि. ऑफिस | : | ३२३, नारायण पेठ, तिसरा मजला<br>मोदी गणपतीच्या मागे<br>पुणे - ३० |
| वर्क्स | : | वैशाली प्रकाशन,<br>द्वारा : विलास बुक एजन्सी,<br>साई प्रसाद रो- हाऊसेस,<br>उदय कॉलनी,<br>सिडको चौथी स्कीम,<br>नाशिक- ४२२००९ (महाराष्ट्र) |
| मुद्रक | : | देवगिरी ऑफसेट, सातपूर, नाशिक |
| अक्षर जुळणी | : | गीता ॲंड, महेंद्र जोशी, नाशिक |
| मूल्य | : | रुपये ३०/- |

## विनोद सम्राट चार्ली चॅप्लीन

विश्वविख्यात विनोदसम्राट चार्ली चॅप्लीनची जनमानसावर वर्षानुवर्षे विलक्षण मोहिनी पडत आली आहे. हा विनोदी नट रहायचा कसा, बोलायचा कसा, चालायचा कसा हे सारेच मनाला पडणारे प्रश्न त्याच्या आयुष्याची कथा वाचल्यावर उलगडतात आणि अत्यंत अभावग्रस्त दारिद्रयात बालपण घालवूनही आईने केलेल्या संस्कारांचे चीज करुन जीवन कसे सार्थकी लावले हेही समजते. ते म्हणतात की माझे जीवन म्हणजे एक नाटकच आहे. मी सारे अनुभवलेले आहे. त्यामुळे माझे चित्रपट जिवंत वाटतात आणि लोकांना जीवनातील वेदनेचा सूक्ष्म परिचय करुन देतात. चार्ली चॅप्लीन म्हंटले की समोर येतो तो विनोदी नट. मात्र या मनस्वी कलावंतांचे आपल्या हसऱ्या आणि विनोदी मुखवट्यातून जीवनाचे वास्तव चित्रण सादर केले आणि सहाजिकच त्याच्या विनोदालाही दुःखाची झालर आली आहे. आणि त्यातून मानवी जीवनाचे दर्शन घडवून अंतर्मुख व्हायला लावले आहे.

## पाचव्या वर्षीच रंगमंचावर पदार्पण :

आई म्हणजे चार्ली चॅप्लीनचे परम दैवतच. त्याच्या आईचे नाव हॅना. रंगमंचावर ती सुरेल संगीत गाऊन, अभिनय करुन लोकांची वाहवा मिळवीत असे. श्रोते तिचा अभिनय, नृत्यकौशल्य, सुस्वर संगीत ऐकत तेव्हा भान हरपून जात. लिली हार्ले या नावाने तिला अभिनेत्री म्हणून ओळखत असत. येशू आणि मेरी यांच्यावर तिची प्रचंड श्रद्धा होती आणि या श्रद्धेच्या जोरावरच तिने जीवनातील अत्यंत विपरीत काळावर मात केली.

लिली हार्ले एकेकाळी जीवनाच्या, ऐश्वर्याच्या, यशाच्या उत्तुंग शिखरावर होती. तिच्या कार्यक्रमाची जाहीरात करतांना तिच्याबद्दल 'विलक्षण बुद्धिमत्तेची गुणी अभिनेत्री .... निष्णात नृत्यांगना, विनोदिनी नटी ... ' अशा विशेषणांनी करीत असत.

मात्र एके दिवशी विपरीतच घडले. लिली हार्लेचा कार्यक्रम होता. रंगमंचावरचा पडदा दूर झाला होता. प्रेक्षागार एकदम शांत झाले होते. वाद्यवृंदाने सुस्वर काढण्यास सुरुवात केली होती. लिली हार्लेचे गाणे रंगात आले होते आणि अचानक काय झाले कोण जाणे तिचा आवाज एकदम चिरकला. काही केल्या कंठातून आवाज फुटेना. ती स्वत: कडून अतोनात प्रयत्न करीत होती. अगदी केविलवाणी झाली होती. ती अगदी पांढरीफटफटीत पडली. पण आवाज उमटेना.

तिचा पाच वर्षाचा धाकटा मुलगा चार्ली हे सर्व विंगेमधून पहात होता.

लिली आत परतली आणि केविलवाणेपणाने मॅनेजरकडे बघायला लागली. मॅनेजरलाही कळेना की हिच्या आवाजाला एकदम काय झालं. मात्र

तो म्हणाला, 'थोडी विश्रांती घ्या, कार्यक्रम तर करायलाच हवा. तुमच्या छोट्या चार्लीला तुमचं गाणं येतं. तुमची हरकत नसेल तर यालाच घेऊन मी स्टेजवर जातो.' आणि छोट्या चार्लीला घेऊन मॅनेजर स्टेजवर गेले आणि प्रेक्षकांना म्हणाले, 'हा चार्ली, लिली हार्लेचा मुलगा. त्याच्या आईची प्रकृति एकदम बिघडली. हा तिचे राहिलेले अपुरे गाणं पूर्ण करील. तुम्ही ते कृपया शांतपणे ऐकून घ्यावे. धन्यवाद !'

आणि काय आश्चर्य. चार्लीने आईचे अर्धवट राहिलेले गाणे सुरु केले. वाद्यवृंद साथ देऊ लागला. सारं थिएटर या स्वरांनी भरुन गेलं. चार्लीच्या गाण्याने सारेजण मंत्रमुग्ध झाले. पैशाची उधळण सुरु झाली. गाणं संपले तेव्हा प्रेक्षकांनी अक्षरश: कौतुकाचा वर्षाव केला. त्याने आणखीनही गाणी म्हणून दाखवली. प्रेक्षकांनी त्याला खूप दाद दिली आणि त्यांनी खूप शाबासकी मिळवली.

भावनां वेगाने लिलीच्या डोळ्यातून पाणी येऊ लागले. केवळ पाच वर्षाच्या तिच्या लाडक्या मुलाने तिचा सारा कार्यक्रम निभावून नेला होता. चार्लीचा जन्म होता १६/०४/१८८९ चा.

त्या रात्री चार्लीनं रंगमंचावर पहिलं पदार्पण केलं ते कायमचं आणि लिली त्या रंगमंचावरुन खाली उतरली तीही कायमचीच. तिच्या आवाजाने तिची साथच सोडली.

मं. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बालवाङमय विभाग
दा. क्र. ४८०० दिनांक. १७/५/०५
विषय. बा. वी. . क्र . ..........

दारिद्र्याचे दशावतार :

लिलीचा पहिला विवाह अफ्रिकेमधल्या सिडनरे हॉक्स नावाच्या मध्यमवयीन तथाकथित लॉर्डशी झाला होता. त्यावेळी लिली हार्ले म्हणजे हॅना केवळ सोळा वर्षांची होती. त्यावेळी हॅना आणि चार्लस चॅप्लीन हे एका आयरिश नाटकात काम करीत असत. या नाटकाचे दौरेही नेहमी होत. अशाच एका दौऱ्यात तिची सिडने हॉक्सची गाठ पडली. त्याच्याबरोबर लग्न करुन हॅना अफ्रिकेला निघून गेली. तिला एक मुलगा झाला. त्याचे नाव सिडने. मात्र थोड्याच दिवसात हॅनाचे आपल्या पतीशी पटेनासे झाले. तिने त्याला सोडून दिले आणि ती इंग्लंडला परतली.

इंग्लंडला परतल्यावर चार्लस चॅप्लीनने तिचा स्वीकार केला आणि तिचा त्याच्याशी विवाह झाला. तीन वर्षांनी चार्लीचा जन्म झाला. दिवस मोठे आनंदात चालले होते. दोघांनीही अनेक वेळा रंगमंचावर एकत्र कामे केली. विनोदी नट म्हूणन चार्लस चॅप्लीन खूप गाजले. त्यांच्या कामावर प्रेक्षक अत्यंत खूष असत. पण दिवस पालटले. नाटकात कामे मिळेनाशी झाली. त्यामुळे चार्लस दु:खी होत गेला आणि दु:ख विसरण्यासाठी त्याने दारु जवळ केली. दारु जवळ झाली आणि पत्नी हॅना मात्र दूर गेली. चार्लस चॅप्लीन आणि आणि हॅना नंतर विभक्त झाले. कोर्ट कचेऱ्यात काही दिवस गेले. पोटगी म्हणून तिला महिना दहा शिलींग मिळण्याचे ठरले. या एवढ्याशा पैशांवर हॅना आणि तिची दोन मुले सिडने आणि चार्ली यांचे थोडेच भागंणार ? नाटकातून काम करुन हॅना चांगली पैसे कमवीत असे. पण त्या दिवशी तिचा आवाज तिला सोडून गेला. पैशाची आवक थांबली. चार्लसचे दारुचे व्यसन

वाढल्याने त्याच्याकडूनही नियमित पैसे येईनासे झाले.

या दारुण परिस्थितीत हॅनाने आपला सर्व भार येशूवर टाकला. चर्चवर तिची अपरंपार निष्ठा होती. हॅना चर्चमधील लोकांचे कपडे शिवून द्यायची. त्यातून थोडीफार कमाई होत असे. सिडने लहानमोठी कामे करुन पैसे कमावून आणीत असे.

मात्र कोणतीच कमाई निश्चित स्वरुपाची नसे. त्यामुळे कधी कधी अर्धपोटी, उपाशीपोटी राहावे लागे. या परिस्थितीमुळे एकेकाळी सुखसंपत्तीचा भोग घेणारी, ऐश्वर्यात राहणारी हॅना अतिशय दु:खी झाली. आपल्या दोन्ही मुलांना आपण पोटभर अन्न देखील देऊ शकत नाही म्हणून तिला अश्रू आवरत नसत. परंतु तिची येशूवर असलेली श्रद्धा तिला उज्वल भविष्याची ग्वाही देत असे.' हे ही दिवस निघून जातील अशी तिला खात्री वाटे. ती म्हणे, 'येशूला स्वत:ला तरी किती त्रास भोगावा लागला ! लोकांसाठी अंगात खिळे ठोकून घ्यावे लागले. परंतु त्यासाठी त्याने कुणालाच बोल लावला नाही. आपल्या अंगात खिळे ठोकणाऱ्या लोकांना ते काय करताहेत हे समजत नाही असे म्हणून त्या अपराधी लोकांनाही त्याने क्षमा केली. 'येशूचं मुलांवर किती प्रेम होतं, त्याला गरीबांची किती कणव होती हे ती वारंवार मुलांना सांगत असे. आईचे बोलणे ऐकून मुले अगदी भारावून जात.

घरातल्या परिस्थितीने तर एक दिवस अशी वेळ आणली की मुलांना खायला द्यायला अक्षरश: अन्नाचा एक कणही नव्हता की पैशाचे एक नाणे देखील नव्हते. मोठ्या घरातून कधीच लहानशा माळावजा खोलीवर ते रहायला आले होते. त्या खोलीतल्या एका कोपऱ्यात एक ट्रंक धूळ खात पडली होती. विकण्याजोग्या सर्व वस्तू विकून झाल्या होत्या हळूवारपणे हॅनाने ती ट्रंक ओढली आणि उघडली. त्या ट्रंकेत तिचे नाटकातले विविध पोषाख होते आणि त्यांच्याशी जुळलेल्या तिच्या भावाकुल आठवणी होत्या. बघता बघता त्यातील निवडक कपडे तिने काढले. अंगावर चढवले आणि क्षीण आवाजात

ती गाऊ लागली आणि गातागाता नृत्यही करु लागली. नृत्य करता करता ती दमली आणि तिने बसून घेतले. ट्रंकेतूनच तिने आपल्या कार्यक्रमाची जुनी जाहिरात दाखवली. त्यात तिचा उल्लेख कितीतरी नामांकित विशेषणांनी केला होता. ते पाहिल्यावर दोघा मुलांच्या मनात आपल्या आईबद्दल अपरंपार अभिमान भरुन आला.

शेवटी उदासवाणेपणाने ती म्हणाली, 'आजवर ही ट्रंक जीवापाड जपून ठेवली परंतु आता हे सारे कपडे, ट्रंक विकून टाकणार आहे.' ते सर्व विकून त्यांची काही दिवसांची भूक भागणार होती.

ट्रंक आणि कपडे विकून आलेल्या पैशावर थोडे दिवस गुजराण झाली. परत पोटाचा प्रश्न आलाच. सतत शिवणकाम करुन हॅनाला खूप श्रम होत असत. मानसिक ताण सोसावा लागे तो वेगळाच. मुलांची ती तशीच समजत काढीत असे आणि सांगे की आपल्याकडे खूप पैसे आले की मी तुम्हाला काही कमी पडू देणार नाही. पोटभर अन्न आणि छान छान कपडे घेईन. सध्या तुम्ही हेच कपडे वापरा. मुलेही आईचे म्हणणे ऐकत आणि शाळेत जात.

## येशूची कृपा :

सिडने चार्लीपेक्षा मोठा होता. त्याने विचार केला की आता काहीतरी उद्योग करायला पाहिजे आणि तो वर्तमानपत्रे टाकण्यासाठी बाहेर पडला आणि अजबच घडले. बसमध्ये चढून वर्तमानपत्र विकत असतांना तो एका सीटवर बसला. बाजूलाच एक पर्स पडली होती. सिडनेने वर्तमानपत्राचा गठ्ठा त्या पर्सवर ठेवला आणि बसमधून उतरतांना वर्तमानपत्राच्या गठ्ठ्याबरोबर त्याने ती पर्सही उचलली आणि बसमधून खाली उतरला. घराजवळ धावतच आला आणि धाडधाड जिना चढून गेला आणि आईला ती पर्स दाखवली. आईने पर्स उलटीपालटी केली. नाणीच नाणी खाली पडली परंतु त्या पर्समध्ये काही पर्सवाल्या व्यक्तीचा पत्ता व ओळख मिळेना. हॅना बेचैन झाली. पर्सचा एक कप्पा उघडायचा राहिला होता. परंतु तो उघडल्यावर पत्ता नव्हे तर सोन्याची नाणीच खाली पडली. तिघंही बघतच राहिले.

हॅनाला समजेना की हे येशूनं पाठवलं की अचानकपणे पाप आपल्या पदरात पडलं ? ' आपण ही पर्स मालकाकडे परत करायला हवी. पण कसं शक्य आहे. मालकाचा पत्ताही नाही. ठीक आहे. आपण ही देवाची देणगी समजू या. येशूनेच हा आधार दिला आहे. त्याचे आभार मानले पाहिजेत. सकाळपासून तुमच्या पोटात काही नाही. घरात नाही खायला जा. काहीतरी खाऊन या.' ..... काही दिवस पर्समधील पैशाचा आधार मिळाल्याने बरे गेले.

असेच एकदा चार्ली बाहेर येत असतांना त्याला एका बाईबरोबर एक गृहस्थ जातांना दिसले. चार्लीने ओळखले की ' हे तर माझे डॅडीच' ते

चार्लीशी बोलले आणि त्याच्या हातावर त्यांनी खाऊ आणण्यासाठी कोरे करकरीत नाणे ठेवले. चार्ली धावत घरी गेला आणि त्याने आईला सर्व हकीकत सांगितली आणि नाणे दाखवले. आई म्हणाले, ' अरे ते फार चांगले आहेत ! काय करणार ! जगाने त्यांना डोक्यावर घेतले आणि नंतर मग तोंडावर आपटले.'' त्याच्या डॅडींबरोबरची ती बाई म्हणजे चार्लीची नवी आई होती. आईच्या तुलनेत त्याला आपल्या आईचा करुणामय, प्रेमळ चेहरा आठवला आणि आईबाबत तो आणखीनच भावविवश झाला.

वर्कहाऊसचे अनुभव :

पर्समधील अचानक मिळालेली संपत्ती संपून गेली. पतीकडून मिळणारी पोटगीही बंद झाली आणि मग शेवटी सॉलिसिटरने हॅनाला सल्ला दिला की तिने वर्कहाऊसमध्ये जावे. वर्कहाऊस म्हणजे अनाथ, पोरक्या मंडळींसाठी काम करुन राबवून घेऊन जेवणखाणाची व्यवस्था करणारी जागा. हॅनाला अत्यंत वाईट वाटले. पण काही ईलाज नव्हता. दोन्ही मुलांना देऊन तिने वर्कहाऊसमध्ये प्रवेश केला. तेथे मुलांना आणि हॅनाला कामाचा पोषाख चढवायला दिला. सर्वांना कामे आखून दिली. संध्याकाळी त्यांना एकमेकांना भेटायची मुभा असे. आई भेटली की चार्ली आणि सिडने एकदम आनंदून जात आणि हॅना आपले कष्ट विसरुन जात असे. पण लवकरच सिडने आणि चार्लीला दूरच्या शाळेत पाठवायंचे ठरले आणि मायलेकरांची ताटातूट झाली. दोन्ही मुले आईवेडी होती. परंतु एकमेकांच्या आधाराने हिंमत बाळगून ती शाळेत गेली. मात्र चार्ली म्हणत असे, आपल्याला आपली आई आहे ना, आपण निराधार नाही, गरीब आहोत हे मात्र खरे ! शाळेची शिस्त अत्यंत कडक होती. लहानशा चुकीलाही जबरदस्त शिक्षा मिळे. नाही होय म्हणायची सोय नसे. चार्लीला बिचाऱ्याला त्याचा काहीही अपराध नसतांना जबरदस्त मार खावा लागला होता. अकरा वर्षाचा झाल्यानंतर सिडनेने नेव्हीत जाण्याचा पर्याय स्वीकारला. त्यासाठी त्याला प्रशिक्षण घ्यावे लागणार होते व चार्लीपासून दूर जावे लागणार होते. चार्ली अगदी हिरमुसून गेला. परंतू गरीबीतून मार्ग काढणे तर आवश्यकच होते.

हॅनाने एकदा हिंमत करुन वर्कहाऊसमधून बाहेर पडून नोकरी

मिळवण्याचा प्रयत्न केला. ती चार्लीच्या शाळेत जाऊन चार्लीलाही घेऊन आली. सिडनेही त्याचे प्रशिक्षण संपवून परत आला. त्या दोघांना घेऊन हॅना एका लहानशा खोलीत राहू लागली. परंतू खूप खटपट करुनही कुठे कामधंदा मिळेना. हॅना हतबल झाली. तिच्या डोळ्यातून घळघळा अश्रू ओसंडायला लागले. तिची ती परिस्थिती बघून सिडने आणि चार्ली तिला बिलगले. त्यांनी आईला धीर दिला. सिडने म्हणाला, ''तूच सांगतेना की येशू परीक्षा पाहत असतो. आपल्याला नक्की चांगले दिवस येतील.' मग तू कां रडतेस ?मी वाटेल ते काम करीन, खूप पैसे मिळवीन. मी आणि चार्ली तुला सुखात ठेवू ... ..' परंतु शब्द आणि भावना यांनी पोट भरत नाही. परत सर्वांना वर्कहाऊसमध्ये जावे लागले. परत मागची पुनरावृत्ती. मुलांना दुसरीकडे शाळेत पाठवण्यात आले आणि हॅना वर्कशॉपमध्येच राहिली. हळूहळू मुले शाळेत रुळली. सिडने फूटबॉल खेळण्यामध्ये खूप रमत असे. असाच एकदा तो खेळत असतांना दोन नर्सेस घाईघाईने तेथे आल्या आणि त्यांनी सांगितले की, तुझ्या आईला वेडाचा झटका आला आहे आणि तिला इस्पितळात दाखल केले आहे. सिडनेला काही समजेना. आपली एवढी शहाणी आई वेडी कशी होईल ? अशक्य, अगदी अशक्य. त्याला काहीच समजेना. त्याला चार्लीला ही बातमी सांगायची होती. अकरा वर्षाचा भाऊ सात वर्षाच्या भावाला समजावणार होता. तो चार्लीला भेटला आणि त्याने कसेबसे त्याला सांगितले की, आईला वेडाचा झटका आला आहे आणि ती वेड्यांच्या इस्पितळात आहे. काय करावं हे दोघांनाही सुचेना. त्यांच्या त्या अवस्थेत हेडमास्तरांनी त्यांना बोलावून घेतलं आणि दिलासा दिला. आणि सांगितलं की कोर्टाने आदेश दिला आहे की तुमची जबाबदारी तुमच्या वडिलांनी उचलावी. तुम्हाला आता तुमच्या वडिलांकडे पाठवण्यात येईल.

आणि खरेच दोन अधिकाऱ्यांनी त्यांना व्हॅनमधून वडिलांच्या घरी आणून सोडले. अधिकाऱ्यांनी दरवाजा ठोठावला. अत्यंत त्रासिक मुद्रेने

त्यांची दुसरी आई लुइसा दारात आली. तिच्या चेहऱ्यावर तिरस्कार भरला होता. वडील घरात नव्हते. परंतु अधिकाऱ्यांनी कागदपत्र दाखवून दोन्ही मुलांना लुईसाच्या स्वाधीन केले. लुईसाला स्वत:चा चार वर्षांचा मुलगा होताच.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बालवाङ्मय विभाग
दा. क्र. ४८०० दिनांक ७।५।०९
विषय बा-वा. ...क्र............

## सावत्र आईशी गाठ :

लुइसा मुलांशी अजिबात धड वागत नसे. खूप काम करुन घेई. बाजारात सामानसुमान आणायला पाठवीत असे. चार्ली सामान घेऊन आला तेव्हा वडील घरी आले होते. त्याला आपले वडील फारच रुबाबदार वाटले. त्यांनी चार्लीला जवळ बसवून घेतले. सर्वजण बरोबर जेवायला बसले. लुइसा मात्र कधीही मुलांशी चांगली वागली नाही. ती नेहमीच त्यांचा दुस्वास करीत राहिली. मात्र दोन्ही भावंडे एकमेकांच्या आधाराने राहत होती.

चार्लीचे वडील नेहमी दारु पीत असत. रात्री घरीदेखील उशीरा येत. एकदा लुइसाचं आणि त्यांचं भांडण झालं आणि ती स्वत:च्या मुलाला घेऊन घराबाहेर पडली. चार्ली शाळेतून आला. त्याला खूप भूक लागली होती. परंतु घरात कपाटात काहीही शिल्लक नव्हतं. तो घराबाहेर पडला आणि वणवण फिरला. सिडने त्याच्यानंतर घरी आला तर चार्ली घरी नाही म्हणून त्याला शोधायला बाहेर पडला. रात्री चार्ली घरी परत आला. अगदी भुकेला आणि रडवेला आणि त्याला धक्काच बसला. दुसऱ्या बाजूने लुईसा झोकांडे खात येत होती. दारु पिऊन ती तर्र झाली होती. चार्लीला पाहिल्यावर ती ओरडली आणि म्हणाली, आत्ताचे आत्ता चालता हो, तुझ्यासाठी खूप केलं. पुरे झालं, नाऊ गेट आऊट. बिचारा चार्ली धाडधाड जिना उतरुन घराबाहेर पडला. त्याचे वडील जवळच्याच पब मध्ये जात असत. तो तिकडे वडीलांकडे जायला निघाला. बाहेरच त्याला त्याचे वडील भेटले. चार्लीला बघून ते थक्कच झाले. इतक्या रात्री तू कुठे चाललास म्हणून विचारायला लागले आणि मग लुइसाने हुसकून दिल्याचे चार्लीने सांगितले. वडील भयंकर संतापले आणि लुइसाच्या

समोर जाऊन गरजले. "तू चार्लीला घरातून का हुसकावलं ?" लुइसानेही प्रत्युत्तर दिलं, " तुम्ही ही चालते व्हा सर्वच्या सर्वजण. " चार्लीच्या वडिलांना संताप अनावर झाला आणि त्यांनी तिच्या तोंडावर धुण्याचा जाडजूड ब्रश आपटला. ती खाली कोसळली आणि बेशुद्ध पडली. एवढ्यात सिडने आला. चार्लीच्या वडीलांनी लुइसाला मलमपट्टी केली, कॉटवर झोपवले, मुलांनाही झोपायला सांगितले आणि ते परत घराबाहेर पडले. दोघांनाही आपल्या आईची तीव्रतेने आठवण झाली. रिकाम्या पोटी झोपही येत नव्हती.

दुसऱ्या दिवशी सर्व वादळ शमले. सर्वजण न्याहारीला बसले. त्यादिवशी चार्लीचे वडील नाटकातल्या गमती सांगत होते. अभिनय करत होते. चार्ली त्यांच्या अभिनयावर एकदम खूष होता. त्यानंतर त्यांचे नाटकाचे प्रयोग असल्याने ते दौऱ्यावर गेले आणि अचानक एक पत्र आले की हॅना बरी झाली आहे, तिला इस्पितळातून सोडले आहे. ती लवकरच येऊन मुलांना घेऊन जाईल. लुइसा खुष झाली. कारण आता मुले जाणार होती. तिने ही बातमी चार्ली आणि सिडनेला सांगितली. दोघांनी एकमेकांना घट्ट मिठी मारली आणि दोघांच्याही डोळ्यात पाणी आले. लुइसा गोंधळून गेली. मात्र, ही दोघे आता जाणार म्हणून ती त्यांच्याशी गोड वागू लागली.

आणि दोन दिवसांनी हॅना आलीच. चार्ली आणि सिडनेची चौकशी करीत. लुईसा लगेच बाहेर आली आणि मुलांना म्हणाली, "तुमची आई तुम्हाला घ्यायला आली आहे." दोघांचा आनंद गगनात मावेनासा झाला. दारात उभी असलेल्या हॅनाला दोघांनी कडकडून मिठी मारली. दोघांनी लुइसाला 'गुडबाय' केले आणि आईबरोबर दोघेही जायला निघाले. लुइसा बघतच राहिली.

## दारिद्र्याशी झुंज :

हॅना नियमितपणे चर्चचे काम करु लागली. तिला पैसेही नियमित मिळू लागले. चार्लसचे वडीलही नियमितपणे आठवड्याला दहा शिलींग पाठवित असत. त्यामुळे हॅना त्यातल्यात्यात मुलांची हौस पुरविण्याचा प्रयत्न करी. एकदा तिने इलस्ट्रेटेड क्लिप्स चा अंक विकत आणला होता. त्यात बरेच कॉमिक्स असत. चार्ली अंक पाहून एकदम खूश झाला. त्याच्यासाठी त्याच्या आईने एक विनोदी प्रहसन देखील लिहून दाखवले. मित्रांची अगदी हसून हसून पुरेवाट झाली आणि मग काय. चार्ली भोवती वर्ग मित्रांची गर्दी जमली आणि त्याच्या एका सरांनी पाहिले. ते देखील इतके खूश झाले की त्यांनी ते प्रहसन त्याला सर्व वर्गासमोर करायला लावलेच पण प्रत्येक वर्गावर्गामधून नेऊन त्याच्या कडून करवून घेतले. ते प्रहसन पाहता पाहता मुले अखंड हसत रहायची. हसून हसून त्यांची अगदी मुरकुंडी वळत असे. सरांनी त्याचे खूप कौतुक केले आणि घरी आल्यावर जेव्हा त्याने सर्व हकीगत आईला सांगितली तेव्हा आईच्या आनंदाला पारावारच राहिला नाही. तिने सांगितले की, आता हळूहळू अशी कामे मिळवत राहायची. संधी अजिबात सोडायची नाही.

आणि येशूच्या कृपेने त्याला त्याच्या वडिलांकडूनच संधी मिळाली. अखेर त्याला जे हवे ते मिळाले होते.

चार्ली एटथ् लॅकेशामर लँडस या ग्रूपमध्ये कामाला जाऊ लागला. तेथे तो इतर मुलांबरोबरच नृत्य करायचा, छोट्या छोट्या भुमिका करायचा. तेथे तो कसरतीचे शिक्षणही घेत असे. त्यामुळे त्याच्यावर खूप ताण पडे.

सतत बाहेरगावी दौरे असत. वेळी अवेळी जेवणखाण होई. त्यामुळे त्याची प्रकृती ढासळू लागली. तो खूप कृश झाला. तशात त्याला दम्याचा विकारही जडला आणि त्याला ते काम सोडावे लागले.

इकडे हॅनाही अखंडपणे मशिनवर बसून शिवणकाम करीत असे. आणि श्रमाने तीही दुखणाईत आली. सिडने जवळच्या पोस्ट ऑफिसात टेलिग्राम बॉय म्हणून काम करी. चार्लीला आपण काही मदत करु शकत नाही याचे फार वाईट वाटे. परंतु आई चार्लीला सांगे की, 'पुढे तुला खूप काम करायचे आहे, आता प्रथम तब्येत चांगली झाली पाहिजे.'

गरीबी तर अपार होतीच परंतु सिडने आणि चार्ली आईला आणि एकमेकांना खूप जीव लावीत आणि आईला तर ही दोन्ही मुले म्हणजे जीव की प्राण होता. दारिद्रयापुढे मात्र काही उपाय नव्हता. सिडनेला खूप काम करायला आवडे. सारखा म्हणत असे की, " आई ही परिस्थिती बदललीच पाहिजे. आपल्याला भरपूर पैसा मिळायला हवा. मी मिळेल तेथे, मिळेल तेवढे काम करीन. परत अशी तंगी येता कामा नये." सिडनेचे वय तर तेव्हा होते केवळ बारा वर्षाचे.

एके दिवशी रस्त्यावर असाच एक ऑर्गनवाला ऑर्गन वाजवत होता आणि त्याच्याबरोबर हास्यविनोदी हावभाव करीत चार्ली नाचत होता. मुले खुश होत होती आणि ऑर्गनवाल्याला पैसे मिळत होते. त्यातून तो काही पैसे चार्लीला देऊ करत होता. परंतु एका गरीब ऑर्गनवाल्याला आपली मदत होते आहे या भावनेने चार्लीने ते पैसे नाकारले परंतु त्या ऑर्गनवाल्याने त्याला काही पैसे देऊ केलेच, घरी येतांना कोपऱ्यावरच्या थ्री स्ट्रॉंग्ज दारुच्या गुत्यात त्याला त्याचे वडील दिसले. खूप थकलेले,खूप दमलेले ! त्यांनी चार्लीला बोलावले आणि आईची व सिडनेचीही चौकशी केली. अगदी भावविवश होऊन त्यांनी चार्लीला मिठीत घेतले व त्याचा पापा घेतला. चार्ली पुरता

भांबावून गेला. मात्र वडिलांची तब्येत बघून तो हादरलाच. वडीलांना खूप दम लागत होता.

घरी आल्यावर तो आईला म्हणाला की आपण वडिलांना इथे आणू. मग त्यांचे दारुचे व्यसन सुटेल. आपण त्यांची खूप काळजी घेऊ. आई गप्प होती.

हॅनाच्या कानावर चार्लीच्या वडिलांना हॉस्पिटलमध्ये ठेवल्याची बातमी आली. ती त्यांना भेटायला गेली परंतु चार्लीचे वडील परतीच्या प्रवासाला लागले होते. तरीही ते हॅनाला म्हणाले की, "मी लवकर बरा होईन. आपण मुलांना घेऊन अफ्रिकेला जाऊ. मजेत राहू, तुम्ही खूप कष्ट सोसलेत." हॅनाला मात्र भविष्य दिसत होते. तिचे डोळे पाण्याने डबडबले. आता असले मनोराज्य करण्यात काहीही अर्थ उरला नव्हता हे तिच्या लक्षात येऊन चुकले होते.

त्यामुळे ती दररोजच हॉस्पिटलमध्ये जाऊन त्यांची भेट घेत असे. परंतु एके दिवशी हॉस्पिटलच्या प्रवेशद्वारात असतांनाच डॉक्टरांनी चार्लीचे वडील मृत झाल्याची बातमी दिली. ते साल होते १९०१ चे. हॅनाला तिचे दु:ख आवरणे कठीण होते. त्यांच्या दफनाची व्यवस्था करण्यासाठीही हॅनाजवळ एक पेनीदेखील नव्हती. मात्र अन्य चॅप्लीन मंडळींनी ती व्यवस्था केली. शवपेटीकेवर सर्वांनी फुले वाहिली पण हॅना एक साधे फूल देखील विकत घेऊ शकली नाही. तिला एकदम आठवण झाली की चार्ली स्वत:च्या खिशात काळ्या काठाचा एक हातरुमाल नेहमी बाळगतो. तिने एक क्षणभर चार्लीकडे पाहिले आणि त्याचा तो आवडता रुमाल बाहेर काढून आपल्या पतीला अखेरची भेट म्हणून शवपेटिकेवर टाकला. हॅनाच्या घरावर उदासवाणी छाया पसरली.

घरात अन्नाचा कण नव्हता की एक पेनी नव्हती. तरी घरी परत येतांना

हॅनाला तिची एक विपन्नावस्थेतील सहकारी अभिनेत्री भेटली होती तिला हॅना घरी घेऊन आली होती. घरातला स्टोव्ह विकून चार पैस आणले होते आणि तिला आधार दिला होता. हॉस्पिटलने चार्लीच्या वडिलांचे कपडे घेऊन जाण्यास सांगितले होते. चर्ली सहज ते कपडे खालीवर करीत होता तेव्हा त्याच्या लक्षात आले की पाय मोज्यात एक सोन्याचे नाणे ठेवलेले आहे. त्यामुळे दोनचार दिवस तरी भुकेचा प्रश्न सुटणार होता.

चार्लीने आपल्या हाताला केप्रच्या कापडाची काळीपट्टी बांधली ती दुखवट्याची खूण असते आणि त्याने फुलांचे गुच्छ विकायला सुरुवात केली. त्याची सगळी फुले विकली गेली. तो खूप खुश झाला. त्याचा आत्मविश्वास दुणावला आणि त्याने मग शाळा सोडून कुठेही मिळेल तेथे काम करायचे ठरवले. कधी डॉक्टरच्या हाताखाली, कधी छापखान्यात पण लहानपणापासूनच शरीर कृश. त्यामुळे तो आजारी पडला. मात्र सिडनेला जॉब मिळाला. तो अफ्रिकेला जाणाऱ्या प्रवासी बोटीवर काम करण्याचा. आईने फार कष्टाने त्याला संमती दिली. आणि सिडने अफिकेला निघाला. दिवस भराभर निघून गेले आणि तो परतला देखील आणि कधी बघितले नव्हते एवढे पैसे त्याने आपल्या आईसमोर टाकले. पगाराशिवाय त्याला टीप्स मिळत असत. त्याही त्याने साठवून घरी आणल्या होत्या. सारेजण खूप आनंदात होते. बोलता बोलता सिडने म्हणाला, ''आपला चार्ली बघ. मोठेपणी हा पैशात न्हाऊन निघेल. कलानंदात डुंबत राहील.'' आणि खरेच घडलेही तसेच.

हॅनाने चार्लीला परत आग्रहपूर्वक शाळेत पाठवायला सुरुवात केली. चार्ली शाळेत जात होता आणि नकळत मानवी जीवनाचे निरीक्षण करीत होता. कचऱ्याच्या ढीगाऱ्यातून ब्रेडचा तुकडा शोधणारा भिकारी पहात होता. त्याचे मन तुटत होते. तो खूप उदास झाला होता.

सिडने परत बोटीवर गेला होता. त्याने ठेवलेले पैसे संपत आले होते. त्याचे पत्र वा निरोप नसल्याने हॅना विलक्षण अस्वस्थ झाली. ती सतत खिडकीत बसून त्याची वाट पहात राही. काम होईनासे झाले होते. मशिनही गेले होते. तिची अन्नावरची वासनाच उडाली होती. ती कसल्या ना कसल्या विचारात गुंतलेली दिसे आणि अखेर अघटित घडले. साराच ताण असह्य होऊन तिला वेडाचा झटका आला. चार्लीला रस्त्यातच कुणीतरी सांगितलं की तुझा आई वेड्यासारखं करते आहे. तो धावतच घरात आला. आईला पाहिल्यावर तो भांबावून गेला. घराच्या मालकिणीने डॉक्टरला बोलावले होते. डॉक्टरांनी चार्लीच्या आईला हॉस्पिटलमध्ये दाखल करुन घेतले.

चार्ली एकटा पडला. नेहमी आधार देणारी, सर्वांना शहाणपण शिकवणारी, उपदेश करणारी आईच वेडी झाली होती. सिडनेही जवळ नव्हता. त्या दिवशी तो एकटाच सगळीकडे फिरला आणि रात्री उपाशी पोटी झोपला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच्या घरमालकिणीने त्याला आग्रहाने खायला घातले आणि आई येईपर्यंत माझ्याजवळच रहा म्हणून सांगितले. आणि लवकरच सिडनेची तो येणार असल्याची तार आली. त्याला अत्यानंद झाला. सिडनेस यावेळी यायला उशीर झाला होता कारण तो आजारी पडला होता आणि त्याला तेथेच रहावे लागले होते.

सिडने आल्यावर चार्लीने आपल्या आईची सर्व हकीगत सांगितली. सिडनेच्या डोळ्यात पाणी आले. रात्री त्याने चार्लीला कपडे आणले, म्युझिक ऐकविले आणि दुसऱ्या दिवशी दोघे तेथून बरेच लांब असलेल्या हॉस्पिटलमध्ये आईला भेटायला गेले.

आईची नजर शून्य होती. पण दोघांनीही तिला तू लवकर बरी होणार आहेस. असे पुन्हा पुन्हा सांगितले. जड अंत:करणाने त्यांनी आईचा निरोप

घेतला.

सिडनेने पैसे जमवले होतेच. त्यानंतर त्याने नाटकात काम मिळवा
ठरवले आणि त्याप्रमाणे फ्रेंड कार्लो यांच्या कंपनीत अभिनयाचे
मिळवलेच आणि चार्लीलाही मिळवून दिले. चार्लीच्या दृष्टीने ही कपंनी न
नवीन प्रहसन सादर करीत असे. ती विनोदी प्रहसने असायची. अशा मो
कंपनीत काम मिळणे ही फार मोठी सुवर्णसंधी होती. ही येशूचीच कृपा
असे त्यादोघांना मनोमनवाटले. त्याक्षणी आपली आई आपल्याजवळ
असे दोघांना फार वाटले.

काही काळ गेल्यानंतर हॅना बरी होऊन परत आली. ती मुलांबरो
दौऱ्यावर जाऊ लागली. पैशांची आवकही वाढली होती. थोडी हौस
होई. घरही तिने छान सजवले होते. तसे दिवसआनंदात चालले होते.

मध्यंतरी चार्लीची दुसरी आई देवाघरी गेली. तिचा एकुलता
मुलगा अगदी एकाकी पडला. हॅना नेहमी त्याला खाऊ घेऊन भेटायला
असे. मात्र हॅनाला परत वेडाचा झटका आला आणि तिचे त्याच्याकडे
थांबले. परत हॅनाची इस्पितळात भरती झाली.

चार्ली आणि सिडनेचे नाटकाचे दौरे चालूच असत. दोघेही
परतल्यावर आईला भेटायला इस्पितळात गेले. दोघांनाही लहानपणीच जगा
खूप अनुभव आला होता. दारिद्रय जवळून पाहिले होते, त्याचे चटके सो
होते. वर्कहाऊसमधले विलक्षण कष्ट आणि आत्यंतिक शिस्त यानेही
पोळले होते. या अनुभवानिशी दोघे मोठे होत होते.

## यशाची चाहूल आणि अमेरिकेत पाऊल :

चार्लीची देहयष्टी दुबळी, चेहरा निस्तेज, अंगकाठी एकदम बारीक, अगदी उपासमार झाल्यासारखा दिसे. परंतु त्याने स्वत:च्या विनोदी अभिनयाने कंपनीचे मालक कार्नो यांना तर जिंकलेच पण प्रेक्षकांनाही खूप हसवले आणि त्यामुळे त्याला एकापाठोपाठ एक अशा नवनवीन विनोदी प्रहसनांमध्ये कामे करायला मिळाली. हमिंग बर्डस याविनोदी प्रहसनात त्याने एका हेरी केली नावाच्या अभिनेत्रीबरोबर काम केले. तो हेरी केलीवर अगदी खूश होता. इतकेच नव्हे तर नकळत तो तिच्यावर प्रेम करु लागला होता. परंतु हे प्रेम फलद्रूप होऊ शकले नाही. चार्लीचे पहिले प्रेमस्वप्न भंगले होते.

चार्लीची गणता आता मोठ्या मान्यवर कलाकारांमध्ये होऊ लागली होती. कार्नो कंपनीत त्याला खूप मान मिळू लागला होता. चार्लीला ते नवनवीन भूमिका करायला देतअसत आणि चार्लीही त्या भूमिका संपूर्ण प्रहसन वाचल्यानंतरच स्वीकारत असे. 'जिमी दि फिअरलेस' हे नवीन प्रहसन होते. चार्लीने त्यात जिमीचे काम केले. सारे प्रेक्षक त्याच्या कामावर बेहद्द खूश झाले. आणि चार्लीला एके दिवशी कार्नोनी अमेरिकेत जाण्याची संधी दिली. त्याच्या संमतीने त्याला तिथल्या तीन प्रहसनांमध्ये प्रमुख भूमिका दिल्या. चार्लीचा आनंद गगनात मावेना. सिडनेला कधी एकदा हे सांगू असे त्याला झाले. सिडनेला ही बातमी समजल्यावर तो ही विलक्षण खुश झाला आणि १९१० च्या सप्टेंबरला चार्ली कार्नो यांच्या ग्रुपबरोबर अमेरिकेला जायला निघाला.

मायभूमी दिसेनाशी झाली. त्याला आपल्या आईची विलक्षण

आठवण झाली. माळ्यावरच्या अंधेऱ्या खोलीत अखंड शिवणकाम करणारी आई, वेडाचा झटका आलेली आई, अतोनात प्रेम करणारा भाऊ सिडने, हेरीची गाठभेट सारे आठवून त्याचे मन गलबलून आले.

अखेर अमेरिका आली. किनाऱ्याकडे बघून चार्ली ओरडलाच, "आली पहा अमेरिका ! मी जिंकणार आहे या अमेरिकेला ! ! प्रत्येक स्त्री पुरुषाच्या आणि मुलांच्या जीभेवर चार्ली चॅप्लीन हे नाव नाचणार आहे !!! अमेरिका आय ॲम कमिंग टू काँकर यू." जणू त्याच्या मुखातून भविष्यवाणीच उच्चारली गेली.

चार्ली कंपनीतला प्रमुख कलाकार बनला होता. त्याचा पगार वाढला होता. अमेरिकेत थिएटरमध्ये चार्ली प्रमुख असलेला द वाऊ बाऊज चा पहिला प्रयोग झाला पण हे नाटक लोकांनी उचलून धरलं नाही. मात्र त्यानंतर नवीन प्रहसन निवडण्यात आले. त्यातही चार्लीची प्रमुख भुमिका होती. ते पात्र लोकांनी अक्षरश: डोक्यावर उचलून घेतले. अनेक ठिकाणी त्याचे दौरे होत. सानफ्रान्सिस्कोला असतांना एक मजेदार घटना घडली. त्याने एका दुकानावर भविष्य सांगणार अशी पाटी वाचली. चार्ली सरळ आत गेला. तेथील जिप्सीबाईच्या सांगण्यावरुन त्याने आपले दोन्ही तळहात तिच्यासमोर धरले आणि धडाधड भविष्य सांगू लागली. तिने त्याचबरोबर पत्त्यांचीही मदत घेतली ती म्हणाली , "आता तू इथून आणखी मोठ्या दौऱ्यावर जाणार आहेस. परंतु तू लवकरच अमेरिकेला परतशील. तुझ्या क्षेत्रा तुला प्रचंड यश, पैसा आणि किर्ती मिळणार आहे. तुझी तीन लग्न होणार आहेत. त्यातली पहिली दोन अयशस्वी होतील. तिसरे मात्र यशस्वी होईल. तुला एकंदर तीन मुले होतील. तुझ्या हातात अमाप पैसा येईल. तुला ब्याऐंशी वर्षाचे आयुष्य मिळेल आणि न्यूमोनिआने तुझा अंत होईल." चार्लीने भविष्य ऐकून घेतले. चार्लीचा दौरा आता त्याच्या मायभूमीकडे होता. त्याला आपल्या आईची

आणि सिडनेची फार फार आठवण येत होती आणि त्या जिप्सी बाईने सांगितलेले भविष्यही पुन्हा पुन्हा मनात घोळत होते.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बालवाङ्मय विभाग
दा. क्र. ४४०० दिनांक १७/५/०८
विषय बा. वा. ...क्र.............

## यशाची वाढती कमान :

मायभूमीत आल्याबरोबर चार्ली आणि सिडने दोघेही आईला भेटायला गेले. नर्सच्या सांगण्याप्रमाणे त्यांची तब्येत अधिकच बिघडली होती. त्या मोठमोठ्याने प्रार्थना म्हणत. त्यांना आवरणे जड जाई. कधी कधी कोंडूनही ठेवावे लागे. चार्लीला याची अजिबात कल्पना नव्हती परंतु इंग्लंडमध्येच असल्याने सिडने हे जाणून होता. आईची अवस्था भयानक झाली आहे हे समजल्यावर चार्लीला तिला भेटण्याचे धाडस होईना. तो विलक्षण अस्वस्थ झाला. सिडने एकटाच आईला भेटून आला. त्यांना नुकतीच बर्फाच्या पाण्याने शॉक ट्रीटमेंट दिली होती. त्या बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हत्याच. मात्र चार्ली आणि सिडने दोघांनी विचार करुन आईला खाजगी इस्पितळात हलवायचे ठरवले. जेणेकरुन तिची अधिक व्यवस्थित काळजी घेतली जाईल.

मध्यंतरी सिडनेने लग्न केले होते. तो चार्लीला त्याच्या फ्लॅटवर घेऊन गेला. आपल्या पत्नीची माहिती दिली. सिडने आनंदात होता. चार्लीने मग स्वत: साठी एक खोली घेतली. तेथे आई आणि सिडनेशिवाय त्याला खूप एकाकी वाटू लागले. अमाप पैसा मिळत होता पण खायला कुणी नव्हते. आणि पूर्वी खायला सर्वजण होते पण पैसा अजिबातच नव्हता. चार्ली विलक्षण अस्वस्थ झाला. मात्र आईची चांगल्या इस्पितळात व्यवस्था केल्याने तो समाधानी होता.

लवकरच कार्नोकडून अमेरिकेच्या दुसऱ्या दौऱ्यासाठी चार्लीला बोलावणे आले. चार्ली खुश झाला. जाण्यापूर्वी तो आणि सिडने आईला

भेटायला गेले. आईची प्रकृती आता खूप सुधारली होती आणि लवकरच ती पूर्ववत होईल असे डॉक्टरांनी सांगितले. त्यामुळे चार्ली शांत चित्ताने अमेरिकेला जायला निघाला. सिडनेनेही त्याला आईच्या प्रकृतीबाबत वारंवार कळवीन असे आश्वासन दिले.

सिडनेने चार्लीला अमेरिकेबाबत विचारले तेव्हा चार्ली म्हणाला की तेथे मी एक कॉमेडी फील्म पाहिली पण ती फारच सामान्य होती. पण तशाही फिल्म तेथे खूप चालतात. आणि मग सिडनेला वाटलेच की चार्ली आता बहुधा कॉमेडी फिल्म मधे काम करणार आणि मग चार्लीने आपला बेत सांगितला की अल्फ्रेड रीव्हज या सहकाऱ्याच्या सहाय्याने मी छोट्या छोट्या फिल्म बनवायचा प्रयत्न करणार आहे. त्यानंतर चार्लीने जिप्सीबाईचे भविष्य सांगितले आणि सिडनेला खात्री झाली की चार्ली खूप खूप मोठा कलाकार होणार आहे आणि अमाप किर्ती आणि पैसा त्याला मिळणार आहे. तिचे भविष्य खरेच ठरणार आहे. चार्लीने सिडनेलाही अमेरिकेत येण्याचा खूप आग्रह केला आणि तू आल्यावर आपण दोघे खूप काम करु शकू असेही सांगितले. त्या दिवशी दोघा भावांनी मनसोक्त गप्पा मारल्या.

अमेरिकेत कार्नो कंपनीचे प्रयोग पुन्हा धूमधडाक्यात सुरु झाले. दोन प्रयोगांमध्ये थोडा वेळ मिळाला की चार्ली खरेदी करे. ऑपेरा बघे एकदा असाच ऑपेरा बघत असतांना वाद्यवृंदाचे आर्त संगीत ऐकून त्याच्या डोळयात घळघळा पाणी येऊ लागले. त्याने आजवर भोगलेल्या हालअपेष्टा त्याच्यासमोर उभ्या राहिल्या. त्याच्या भावभावना उचंबळून आल्या. घरी परतल्यावर तो इतका थकला होता की न जेवताच झोपून गेला.

न्यूयॉर्कमधून चार्ली फिलाडेल्फियाला आला. कार्नो कंपनीचा मुक्काम त्यावेळी तेथे होता. तेवढ्यात न्यूयॉर्कच्या फिल्म प्रोड्यूसरची त्याला ताबडतोब

येऊन भेटण्याची तार आली. चार्ली त्यांना भेटला. यापूर्वी त्या फिल्म प्रोड्यूसरने चार्लीचे काम पाहिले होते. त्यांनी लगेच चार्लीशी फिल्ममध्ये काम करण्याबाबतचा एक वर्षाचा करार करुन टाकला. कार्नो कंपनीला अखेरचे प्रहसन करुन चार्लीने झगमगत्या पडद्यावर पराक्रम करण्यासाठी सर्वांचा निरोप घेतला. चार्लीला सहकलाकारांचा निरोप घेतांना फारच दु:ख झाले. त्यांचा सुखकारक सहवास त्याला आता मिळणार नव्हता. तो एकसारखा रडत होता व डोळे टिपत होता.

चार्ली फिल्ममध्ये काम करण्यासाठी की स्टोन स्टुडिओत हजर झाला. तेथे कलाकार, वेशभुषाकार सेट लावणारी मंडळी या सर्वांची प्रचंड धावपळ होती. चित्रपट निर्मितीच्या सर्व पद्धती त्याने समजावून घेतल्या आणि चार्लीच्या आयुष्यात तो भाग्याचा दिवस उजाडला. त्याला एक प्रेस रिपोर्टरचं काम प्रथम करायला मिळालं. त्यानंतर त्याच्या प्रोड्युसरने त्याला विनोदी पोषाख करुन यायला सांगितलं आणि चार्लीने एका जाडशा नटाची ढगाळ विजार अंगावर चढवली. तळ काढून टाकलेले मोठे शूज पायात घातले. बॅगी पँटवर तंग जाकेट आणि तंग कोट घातला. हातात एक काठी घेतली. मिशा लावल्या हॅट घातली आणि प्रोड्युसरसमोर जाऊन त्याचे काम समजावून सांगितले. चार्लीने काम सुरु केले आणि मग असा हशा पिकला की विचारु नका. सर्वांनी त्याची पाठ थोपटली. चार्ली एकदम खूष झाला. तशात सिडनेचे त्याला अमेरिकेत काम मिळाल्याचे पत्र आले. मग काय चार्लीच्या आनंदाला पारावा राहिला नाही.

चार्लीचे शूटिंग सुरु झाले. त्याचे विनोद स्वतंत्र असत. ओढूनताणून केलेले नसत. त्यात वैशिष्ट्य असे. नवनिर्मिती असे. त्याच्या कल्पनाही स्वतंत्र असत. मात्र प्रथम प्रथम त्याच्या कल्पना धुडकावल्या जात असत. परंतु चार्लीचे नांव अक्षरश: घरोघर जायला लागले होते. लोकांना तो फार

प्रिय होत चालला होता. त्यामुळे त्याच्या कल्पना धुडकावणं दिग्दर्शकाला परवडणार नव्हते. त्याच्या फिल्मस्ना तुफान मागणी येत होती. सर्वजण त्याच्याशी आता जपून वागत होते. त्याला स्वतंत्रपणे फिल्मस् करण्याची परवानगी देखील देण्यात आली. फार काय दिग्दर्शकांनी देखील त्याला बोलावले आणि सांगितले की तुझा भाऊदेखील चांगला अभिनेता आहे तर त्यालाही बोलावून घे. आपण त्याच्याशीही करार करुन टाकू कामाचा. चार्लीला फारच आनंद झाला. त्याने ताबडतोब सिडनेला बोलावून घेतले.

सिडने आल्यावर त्याला घेऊन चार्ली आपल्या दिग्दर्शकांकडे गेला आणि मग सिडनेशीही कामाचा करार झाला. चार्लीच्या फिल्म इंग्लंडमध्येही खूप लोकप्रिय झाल्याचे सिडनेने सांगितल्यावर चार्ली फारच खूश झाला. चार्लीप्रमाणे सिडनेचीही फिल्म कारकीर्दी उत्तमप्रकारे सुरु झाली. दोघा भावांचे जगभर नांव गाजू लागले आणि मग स्वतंत्र फिल्म निर्मितीच्या कल्पना चार्लीच्या मनात घोळू लागल्या. चार्लीशी करार करण्यासाठी आणखी एक कंपनी पुढे आली आणि कल्पनेपेक्षा कितीतरी मोठं भाग्य त्याला मिळालं. आठवड्याला साडेबाराशे डॉलर्स पगार आणि दहा हजार डॉलर्स करारापूर्वी बोनस. पहिल्या कंपनीचा करार संपवून चार्ली नवीन कंपनीत हजर झाला. १९१५ साल संपले तेव्हा चार्लीच्या बारा फिल्म तयार झाल्या होत्या आणि त्याच्यावर दिग्दर्शक, सहकलाकार आणि प्रेक्षक सारेच फार खुष होते. कंपनीचे वार्षिक उत्पन्न वाढले होते आणि चार्लीला प्रत्येक फिल्ममागे पंचवीस हजार डॉलर्स एवढा बोनस मिळत होता. अफाट लोकप्रियता आणि प्रचंड पैशांवर चार्लीला समाधान नव्हते. त्याला अजून खूप मजल गाठायची होती.

सिडनेचा आणि चार्लीचा निरनिराळ्या कंपनीशी असलेला करार साधारणपणे एकदमच संपला आणि मग सिडनेने चार्लीला स्वतंत्र फिल्मची कल्पना आपण राबवू असा आग्रह धरला. सिडने तर उत्तम अभिनेता होताच

पण चार्लीची लोकप्रियता शिगेला पोहचली होती. खेळण्याच्या दुकानातून ट्रॅम्पच्या वेषातले त्याचे पुतळे विकले जात होते. सिगरेटची पाकिटे, टूथपेस्ट, मेणबत्त्या, खेळणी यांसारख्या साऱ्या वस्तूंवर त्याचे फोटो छापले जात होते. चार्लीचे मोठमोठे पोस्टर्स लावले जात होते.

चार्लीच्या फताड्या शूज पासून डर्बी हॅट पर्यंतच्या संपूर्ण पेहरावाला अर्थ होता. ते एक विक्षिप्तपणाचे व्यंगचित्र होते. पोकळ आणि भोंगळ लोकांचे प्रतिनिधित्व करणारा, काठीची ऐट बाळगणारा, कुणाच्याही कॉलरमध्ये काठी अडकवून त्याला पाठीमागे ओढणारा वा कुणाच्याही पायात काठी अडकवून त्याला पाडायला लावणारा तो पेहराव होता. चार्लीचा विनोदी पेहराव हा त्याच्या विनोदाचे मर्म सांगणारा होता.

न्यूयॉर्कला जायला निघाल्यावर त्याच्या एका मित्राने त्याला मोलाचा सल्ला दिला की तू लोकांपासून दूर राहण्याचा प्रयत्न कर. त्यामुळे लोकांच्या मनात तुझ्याबाबत उत्सुकता वाढेल आणि तुला बघण्यासाठी थिएटरमध्ये गर्दी वाढेल. आणि लोकांमध्ये गर्दीत जातांना ट्रॅम्पचा पोषाख न घालता चारचौघांसारखा पोषाख कर म्हणजे तुला उघडपणे फिरता येईल.

प्रवासात त्याला आपल्या आईची, गरीबीत काढलेल्या हालाखीच्या दिवसांची, आपल्याला सुखी ठेवण्यासाठी धडपडणाऱ्या आईची फार आठवण झाली व त्याचे मन भरुन आले आणि मग त्यांनी मनाशी निश्चय केला की आपण माणसाची दु:ख दूर करुन त्यांना हसत ठेवण्यासाठी काम करायचे. आई वेळोवेळी सांगत असलेल्या येशूची त्याला आठवण झाली.

विचारांच्या नादात न्यूयॉर्क आलेही. स्टेशनवर प्रचंड जनसमुदाय जमला होता. चार्ली चॅप्लीनचे स्वागत करण्यासाठी त्याला पाहताच लोकांनी त्याच्या नावाचा जयघोष सुरु केला. मेयरही हजर होतेच. ते प्रचंड स्वागत बघून चार्ली भांबावून गेला. वर्तमानपत्रातही मोठ्या शीर्षकात चार्लीच्या

आगमनाची बातमी छापून आली होती. सिडने स्टेशनवर आला होताच.

सिडनेने चार्लीसाठी केलेल्या म्युच्युअल फिल्म कंपनीच्या कराराबाबत सांगितले. त्यानुसार त्याला दर आठवड्याला एक हजार डॉलर्स याप्रमाणे एकूण सहा लाख सहा हजार डॉलर्स मिळणार होते. स्वत:चे काम सांभाळतांना चार्लीचे आर्थिक व्यवहार सांभाळण्याची जबाबदारी सिडनेने स्वत:कडे घेतली. चार्ली मनाशी म्हणाला, हा माझा भाऊ माझ्यासाठी किती राबतो आहे. दोघे भाऊ एकत्र बसून गप्पा करतांना त्यांना आईची फार आठवण झाली. दोघांनाही आईला अमेरिकेला आणायची फार इच्छा होती. परंतु अजून काही दिवस इंग्लंडमधील हॉस्पिटलमध्ये ठेवून नंतर तिला इकडे आणू असे त्यांनी ठरवले. आईची तब्येत दरम्यान आणखीन सुधारेल व ती एकदम चांगली होईल याची दोघांना खात्री होती. सिडने आईला भेटत होताच मधून मधून. चार्लीच्या डोळ्यात मात्र आईच्या आठवणीने पाणी आले होते.

## आईशी भेट :

सिडने काम करीत होता आणि चार्लीसाठी मोठ्या रकमांचे करारही करीत होता. चार्लीला पैशांमध्ये तसा रस कधीच नव्हता. तेव्हा नव्या बारा लाखांच्या कराराबद्दल ऐकल्यावर तो छान एवढेच म्हणाला. तो व्हायोलीन वाजविण्यात रमला होता. न्यूयॉर्कमध्ये आल्यावर त्याचे मित्रमंडळ वाढले. डालस नावाच्या एका मित्राच्या सल्ल्याने तो फिल्म क्षेत्रात स्वत:ची स्वतंत्र फिल्म काढण्याचे बेत योजीत होता. मिल्ड्रेड नावाची एक अभिनेत्री त्याच्या प्रेमात पडली होती. परंतु पुढच्या फिल्मचे विचार त्याच्यां डोक्यात घोळत होते. त्यामुळे त्याच्या मनावरचे मळभ लवकरच दूर झाले. तशातच त्याला सिडने भेटला आणि आई तेथे लवकरच येणार असल्याचे सांगितले. चार्लीच्या आनंदाला पारावर राहिला नाही. दहा वर्षांनी त्याला त्याची आई भेटणार होती. आपल्या एका खास मित्राला त्यांनी आईला इंग्लंडहून घेऊन येण्यास सांगितले होते ....

आणि अखेर गाडी स्टेशनवर थांबली. चार्लीचा मित्र खाली उतरला आणि त्याच्या पाठोपाठ एक वृद्धा, नर्सचा हात धरुन येत होती. चार्लीच्या डोळ्यातून अश्रू ओघळायला लागले. दोघांनी पुढे होऊन आईचा हात धरला. आईच्या कुशीत शिरण्याची चार्लीला अनिवार इच्छा झाली.

चार्लीने आईला प्रवास कसा झाला म्हणून विचारलं. आई म्हणाली, ''तुझा मित्र होता ना बरोबर ! आणि तो येशुसुद्धा !'' असं म्हणून आई कशीतरी हसली. चार्लीच्या मनात चर्र झालं. तिच्या हसण्यानं तो गडबडला.

आपल्या बंगल्याशेजारीच त्याने आईसाठी खास बंगला सजवला

होता. सुंदर बगीचा केला होता. दिवसभर काम करणारे नोकरचाकर ठेवले होते. नर्स होती. कशा म्हणून कशाला काही कमी नव्हते. त्याची आई एका सोफ्यावर बसली. चार्ली तिच्याजवळ गेला. त्याने तिला कडकडून मिठी मारली आणि तिच्या गालाचे चुंबन घेतले. तिचा हात हातात घेतला ती म्हणाली, "काही कमी नाही ना ?" चार्लीच्या पाठीवर हात फिरवून ती म्हणाली, "काही कमी नाही आणि हे बायबल आहेच इथे एवढे असल्यावर काय पाहिजे ?" सिडनेही तिथे होताच तो म्हणाला, "आपण तिघे इथे एकत्र आहोत हे खरेच वाटत नाही." चार्लीची आई हळूच उठली आणि एका कोपऱ्यात ठेवलेल्या पियानोवर तिची बोटे फिरु लागली. तिचे गाणे थांबल्यावर दोघांनी जोरजोरात टाळ्या वाजवल्या. खूप गप्पा झाल्या.

आईची नीट काळजी घ्यायला सांगून दोघे बाहेर पडले.

आईची चांगली व्यवस्था लागली होती. सिडने तिच्याजवळ राहणार होता. त्यापुढे चार्लीने काही कामानिमित्त इंग्लंडला आपल्या मायभूमीला जाण्याचे ठरवले. तेथे ही हजारो लोकांनी त्यांचे स्वागत केले. चार्लीच्या जुन्या आठवणी चाळवल्या गेल्या. माळ्यावरच्या ज्या एका खोलीत अत्यंत दारिद्रयात दोघे भावंडं आईबरोबर राहत होते ती खोली देखील चार्ली बघून आला. सर्व आठवणीच्या गोष्टी उजळून निघाल्या. तेथेच त्याची पहिली मैत्रीण हेरी गेल्याचे त्याला समजले. तो अत्यंत दु:खी झाला. वियोगाचे दु:ख मनात दाटून गेले. पहिले प्रेम अशाप्रकारे स्मृतीत अंतर्भूत झाले होते. हे दु:ख फिल्ममधून करायचा विचार करीत तो अमेरिकेला पोहचला.

चार्ली घरी आला तर त्याची आई सिडनीजवळ बसून बायबल वाचत होती. चर्चमध्ये असतांना रेव्हरंडने सांगितले होतं की, "येशू आणि मेरी यांच्या पवित्र नात्याचे स्मरण करा. त्याच्याजवळ जे मागाल ते मिळेल." तिने अनेकदा येशूची मन:पूर्वक प्रार्थना केली होती. पण पोटापुरतं सोडाच पण अर्धामुर्धा

घासही तिचा आवाज गेल्यापासून मिळाला नव्हता. सारं आयुष्य दुःखात पिंजून निघालं होतं. मात्र इथे आल्यापासून तीही परिस्थिती बदलली होती. सुखाचे स्वर्गाचे द्वार उघडले होते. भरभरुन सुख मिळाले होते. मात्र तिचं मन आता भोगातून विरक्तीकडे वळायला लागले होते. चार्ली घरात आला आणि त्याने आईला एकदम मिठी मारली. त्याच्या इंग्लंडच्या दौऱ्याच्या बातम्या,

फोटा वर्तमानपत्रात पाहिले असल्याचे तिने सांगितले आणि म्हणाली, "मला वाटतं तू या स्वप्नमय कृत्रिम जगात वावरण्यापेक्षा दुसरं काहीतरी भरीव कार्य करावं. तू खूप गुणी आहेस. त्या गुणांचा ईश्वरसेवेसाठी उपयोग कर." चार्लीने ऐकून घेतले. घरातील नोकराने सांगितले की, "तो इंग्लंडला असतांना त्याच्या आईची मानसिक अवस्था दोनदा बिघडली होती. एकदा दुकानात जाऊन कापडाचे तागेच्या तागेच तिथे आणले होते. त्याचे काही ड्रेस शिवले. काही तसेच पडून आहेत. एके दिवशी फार गरम होत होते. त्यादिवशी आईस्क्रिमचा त्यांनी एक कोन घेतला आणि एका कामगाराच्या तोंडावरच फेकला होता आणि म्हणे, तुला थंडाव्याची फार गरज आहे.' .......... चार्लीने सर्व ऐकून घेतले.

आईचा निरोप घेऊन चार्ली निघाला. लोकांना सतत हसवत ठेवणाऱ्या फिल्म एकामागून एक तो काढीत होता. चार्लीला चित्रपटासाठी नवीन नवीन कल्पना मिळत होत्या. चित्रपट उत्तम चालत होते. 'द गोल्ड रश' या चित्रपटाचे शूटिंग चालू असतांना लिटाशी त्याचा विवाह झाला आणि तो नवीन बंगल्यावर रहायला गेला. 'द गोल्ड रश' हा चित्रपट अप्रतिम झाला होता. आर्टिस्टना प्रचंड फायदा झाला होता. नव्या घरात लिटाच्या तैनातीला नोकरचाकर होते. तशात लिटाला दिवस गेले. चार्ली अगदी आनंदून गेला.

## संपन्नतेचा पूर आणि आईची अपेक्षा :

त्यादिवशी चार्लीची आई चार्लीचे घर बघायला आली आणि थक्क झाली. बापरे केवढं मोठ घर आणि किती सुंदर बगीचा. सर्व खोल्या तिने फिरुन पाहिल्या. फायरप्लेस कडे तिचं लक्ष गेलं आणि तिथे कोळसे जळत असलेले बघून ती म्हणाली, "तू इथे कोळसेच जाळतो वाटतं, इथल्या सारखी लाकडं नाही वाटतं जाळत." चार्ली म्हणाला, "नाही इंग्लंडसारखं मी इथे कोळसेच फायरप्लेसमध्ये जाळतो." चार्ली म्हणाला, "नाही ग आई कसा विसरेन मी मायभूमीला. मी तर इथलं नागरिकत्वही घेतले नाही." आई त्यावर म्हणाली, "कधी नको विसरु आपल्या मायभूमीला आणि येशूला देखील." चार्ली आईशी प्रेमाने गोष्टी करीत होता. बोलता बोलता तो म्हणाला, "आई या क्षणी आपल्याजवळ पन्नास लाख डॉलर्स आहेत." त्यावर आई म्हणाली, "बापरे या पैशात तू पोट चांगल्याप्रकारे भरु शकशील. प्रकृती सांभाळू शकशील, तुझी कधीही उपासमार होणार नाही. तेव्हा तुझे सारे गुण, तुझी हुशारी येशूच्या सेवेसाठी खर्च कर. जगातल्या हजारो दु:खी कष्टी लोकांची सेवा कर. तीच येशूची सेवा आहे. तुला माहित आहे ना की सुख आणि आनंद मनावर अवलंबून असतात. टेरेसवाल्या लंडनच्या आपल्या लहानशा खोलीत आपल्याला टिचभर पोटदेखील भरता येत नव्हते पण आपण आनंदाने दिवस काढलेत ना. आनंद आणि सुख बाहेरच्या गोष्टींवर अवलंबून नसतं. ते मनावरच असतं." त्यावर आईला आश्वस्त करीत चार्ली म्हणाला, "आई मी तुला वचन देतो की माझ्या चित्रपटमाध्यमातून येशूचा संदेश मी जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवीन." आईने चार्लीच्या मनात नवीन विचारांची ज्योत

प्रज्वलित केली होती.

चार्लीचे आयुष्य खुशीत चाललं होतं. त्याला दोन मुलेही झाली. लिटाच्या आग्रहावरुन पहिल्या मुलाचं नाव ठेवलं चार्लस् आणि चार्लीच्या आग्रहावरुन दुसऱ्या मुलाचं नाव ठेवलं सिडने. नाव ठेवण्यावरुन दोघांमध्ये खटके उडले होते. अलीकडे वारंवार खटके उडत. कारणे अगदी क्षुल्लक असत. नोकरांवरुन वादविवाद होत. चार्लीच्या नोकरांनी त्याला पहिल्यापासून साथ दिली होती. त्याच्या आवडीनिवडी ते जाणून असत. त्यांना काही सांगावे लागत नसे. लिटाला नेमके हेच खटकत असे. तिला तेथे परक्यासारखे वाटे, चिडायला होई आणि अखेर लहानसहान वादांचे पर्यवसान मन दुभंगण्यात झाले आणि लिटा मुलांना घेऊन माहेरी निघून गेली. पुन्हा न येण्यासाठी आणि अखेर त्यांचा घटस्फोट झाला. आपल्या आयुष्यात संसारसुख नाही याची खात्री चार्लीला वाटायला लागली. त्याची आई मात्र विषण्ण व्हायची. वर्तमानपत्रातूनही नाही नाही त्या बातम्या झळकायच्या.

परत एकदा चार्ली नव्या जोमाने चित्रपटनिर्मितीला लागला. त्याच्या जीवनातील कितीतरी घटना त्या चित्रपटात अंतर्भूत होत्या आणि एकदिवस तो कामात असतांना अचानक फोन आला की "त्याच्या आईला पित्ताचा त्रास झाला आहे आणि तिला दवाखान्यांत पोहचवावे लागले आहे." तो धावत पळत तेथे पोहचला तर डॉक्टरनी आईची तब्येत गंभीर असल्याचे सांगितले. हृदय दुर्बळ असल्याने ऑपरेशन करता येणार नाही. हेही सांगितले. चार्ली कितीतरी वेळ आईचा हात हातात घेवून बसला. आई अर्धवट ग्लानीत होती. चार्ली म्हणाला, "आई तू लवकर बरी होशील, चांगला आराम कर." त्यावर ती म्हणाली, "काही सांगता येत नाही. कदाचित ..." एवढे बोलून ती बेशुद्ध झाली आणि तिचा अंत झाला. सिडने त्यावेळी युरोपात गेला होता. त्याला निरोप देणे कठीण होते आणि येणे तर त्याहून कठीण कारण तो तेथे आजारी

पडला होता आणि अखेर व्हायचे तेच झाले. आईची चिमुकली, कृश, श्रांत, क्लांत मूर्ती बघून चार्लीला भडभडून आले. किती खस्ता काढल्या होत्या, पण कुठे कडवटता नव्हती. येशूवरची श्रद्धा ढळली नव्हती आणि मुलांना उत्तम संस्कार देवून मोठे बनवले होते. तुम्हाला मोठं व्हायचं आहे ही जाणीव सतत त्यांच्या मनात जागती ठेवली होती. आईच्या या संस्कारामुळे आपण एथपर्यंत पोहचलो हे दोघे भावंड जाणून होती. सिडने आला आणि दोघे भाऊ आईच्या आठवणीने अगदी गलबलून गेले. आईची शेवटीची भेट घेता आली नाही याचे शल्य सिडनीला बोचत राहिले. दोघे कितीतरी वेळ आईच्या आठवणी काढीत बसले होते. त्या कधीच संपणार नव्हत्या.

सिटी लाईटस् हा चार्लीचा मुकपट प्रचंड चालला. विख्यात शास्त्रज्ञ अल्बर्ट आइन्स्टाईन ह्यांनी देखील हा चित्रपट आपल्या चार्लीबरोबर पाहिला. चार्लीने त्यांच्या बरोबर जेवण घेतले. चित्रपटातील हृद प्रसंग बघतांना एवढ्या मोठ्या शास्त्रज्ञाच्या डोळयातून भावविवशतेने घळघळा अश्रू वाहत होते. सिटी लाईटस्च्या प्रशंसेने वर्तमानपत्रातील रकानेच्या रकाने भरले होते.

चार्लीची दोन्ही मुले त्याच्याकडे कायम येत असत. चार्ली प्रेमाबरोबर त्यांना शिस्तीनेही वागवित असे. ठराविक मित्रमंडळी बरोबर चार्लीच्या गप्पा रंगत असत. सिटी लाईटस् चित्रपट घेवून तो युरोपला गेला: तेथेही त्या चित्रपटाचे खूप स्वागत झाले. बर्नार्ड शॉ, पंतप्रधान मॅकडोनल्ड, विन्स्टन चर्चिल यांच्यासारख्यांशी त्याचा भेटीचा योग आले. ते सर्व त्याचे चहाते होते. मात्र भारतातल्या महात्मा गांधींनी त्याचे चित्रपट (पाहिले नव्हते. तरीही चार्लीला त्यांच्याबद्दल प्रचंड आदर होता. तो म्हणे की देशाची सेवा हीच त्यांची करमणूक आहे. लंडनच्या थंडीत अंगावर कपडा न घालता, कमरेला केवळ आखूड वस्त्र घालणारी व्यक्ती माझ्या बघण्यात नाही. माझे चित्रपट बघून स्वतःची करमणूक करुन घेण्यापेक्षा भारतीय जनतेची दुःखे

समजावून घेण्यात त्यांना अधिक रस आहे. चार्लीची महात्मा गांधीशी सुद्धा भेट झाली होती. माणूस आणि यंत्र या विषयावर त्यांच्याशी बोलणे झाले होते. त्यावर ते म्हणाले होते की यांत्रिकीकरण करुन मी माझ्या बांधवांना उपाशी मारायचं काय ? आणि तोच विषय घेवून मी यांत्रिकी करणावर विडंबनाचा एक चित्रपट बनवतो आहे.

चार्ली मॉडर्न टाईम्स हा चित्रपट बनवित असतांना पॉलेट गेडार्ड या अभिनेत्रीशी त्याचा परिचय झाला आणि परिचयाचे रुपांतर प्रेमात खरे तर ती चार्लीच्या मानाने खूप लहान होती. अवघी वीस वर्षाची परंतु तिचे चार्लीवर खुप प्रेम होते आणि ती बुध्दीमानही होती. अखेर प्रेमाची परिणती विवाहात झाली. तिने दोन्ही मुलांना एकदम आपलेसे करुन टाकले. त्या दोघांनाही ती खूप आवडे. ते तिच्याबरोबर टेनिस खेळत. फिरायला जात. पॉलेटही त्यांचे खूप लाड करीत असे आणि त्यांच्यावर मनापासून प्रेम करीत असे. चार्ली पण पॉलेटवर खुश होता आणि पॉलेटही चार्लीवर. अचानक एक दिवस त्याचा भाऊ सिडने त्याला भेटायला आला. दोघा भावांच्या भेटी आता दुर्मिळ होत होत्या. दोघांनी नविन चित्रपटाच्या कथेची चर्चा सुरु केली होती. एकंदर राजकीय वातावरण बघून हिटलरवर चित्रपट काढण्याचा ठरला. ते १९२९ साल होतं. युद्धाची ठिणगी पडली होती. हिटलरच्या विनाशक शक्तीचा विधायक सिद्धतेशी सामना होता. चार्लीने फार मोठं आव्हान स्विकारले होते. पॉलेटही त्यात काम करणार होती. या चित्रपटाच्या द्वारे चार्ली मानवतेचा संदेश घरोघरी पोहचवणार होता. त्याच्या आईने त्याला वारंवार सांगितले होते की, तू येशूचा संदेश विश्वशांतीचा संदेश सर्वदूर पोहचव. आणि आपल्या द ग्रेट डिक्टेटर या चित्रपटात चार्लीने तेच काम केले होते. त्यातील संवाद, शब्दांची फेक तर इतकी अप्रतिम होती की, हिटलर सारख्या हृदयाचीही चलबिचल व्हावी. सिडने चार्लीला म्हणाला देखील, खरच चार्ली आईला

दिलेला शब्द तू पूर्ण केलास. चार्लीचे डोळे आईच्या आठवणींनी डबडबले होते.

द ग्रेट डिक्टेटर या चित्रपटाने यशाचे सर्व उच्चांकमोडले होते. त्याला अपरंपार लोकप्रियता मिळाली होती. मात्र त्याच्या व्यक्तिगत संसार विखुरला होता. पॉलेटने या चित्रपटात भूमिका केली होती. परंतु तिला तिच्या भुमिकेमुळे "अमेरिकेतील निर्वासित" हा चित्रपट तयार करण्याचे आश्वासन चार्लीने दिले होते पण चार्ली ते पूर्ण करु शकला नाही. द ग्रेट डिक्टेटर पूर्ण होईपर्यंत दोघेही थांबले. नंतर पॉलेटने घटस्फोट घेतला. परत एकदा ते भव्य घर सुनसान झाले. मुलांनाही तिचे जाणे फारच लागले.

मं. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बालवाङ्मय विभाग
दा. क्र. ४८०० दिनांक. ९०।५।०८
विषय. बा.वा. क्र.

## अमेरिकेतील कटू अनुभव :

त्यानंतर चार्लीच्या जीवनात खळबळजनक घटना घडली. जोन नावाच्या त्रासदायक अभिनेत्रीने त्याचा पाठपुरावा केला. त्याला निरनिराळ्या प्रकारे त्रास देण्याचा प्रयत्न केला. त्याच्यावर खोटे नाटे आरोप रचले. पण तो अटीतटीला झुंजला. न्यायालयात त्याच्या बाजूने निकाल लागला.

त्याच्या एका सत्कार समारंभात भाषण करतांना त्याने आपल्या भाषणाची सुरुवात 'काम्रेडस' अशी केली. रशियन वॉर रिलीफसाठी त्याने भरीव मदत केली. त्याच्या भाषणाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. मात्र त्याच्या वाट्याला मनस्ताप झाला. त्याने अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारले नव्हते. तो स्वत:ला सिटीझन ऑफ वर्ल्ड समजत होता. अमेरिकनांचा यापुढे चार्लीला विरोध सहन करावा लागत होता. वर्तमानपत्रावाटे पत्रकार त्याला खूप सतावित होते. त्याचा मानसिक छळ होत होता. त्याच्या विरुद्ध फलक झळकत होते. "या परवाच्या माणसाला हाकलून द्या, पेइंग गेस्ट म्हणून येथे हा खूप दिवस राहिला. त्याला कम्युनिस्टांचा खुप कळवळा आहे, त्याला बर्लिनला रशियात पाठवून द्या."

मात्र या दरम्यान एक अनुकूल घटना घडली. ऊना ओनिल नावाची प्रसिद्ध लेखक मग्रे ओतील यांची मुलगी त्याच्या आयुष्यात आली, आणि सतरा वर्षाची ही मुलगी पन्नाशीच्या चार्लीच्या चक्क प्रेमात पडली. चार्ली तिला आपल्या घरी घेवून आला आणि त्याने आपल्या मुलांशी तिची ओळख करुन दिली. चार्लीचा चार्लस तिच्याच वयाचा होता. ऊना दिसायला फारचं सुरेख होती. तिच्या वागण्यात अजूनही मृदूपणा होता. तिने चार्लीशी विवाह

केला आणि त्याला प्रेमाची उब दिली. परत एकदा चार्लीचे घर आनंदाने भरुन गेले. जोनच्या प्रकरणात तिने चार्लीला खूप साथ दिली.

चार्लीचा नवा चित्रपट मिस्यॅू व्हर्दी तयार झाला. मात्र हा चित्रपट दाखवला गेला तर थिएटरवर वर्षभर बहिष्कार टाकला जाईल अशी धमकी अमेरिकन लोकांनी वितरकांना दिली होती. त्यामुळे दुसऱ्याच दिवशी चित्रपट बंद झाला. मंदीच्या काळात नोकरी गमावून बसलेल्या व त्यानंतर पैसे कमविण्यासाठी अनैतिक मार्ग स्वीकारणाऱ्या नायकाची ही कहाणी होती. तथाकथित उच्चभ्रु समाजावर हे कोरडे होते. परंतु लोकांना मात्र हा चित्रपट अनैतिक व समाजहित विरोधी वाटला. चार्लीची दोन्ही मुले चार्लीस आणि सिडने मद्यपान करु लागली होती. त्यांच्या मनावरचा ताबाही सुटत होता. आपल्या वडिलांना आपली फार काळजी वाटते हेही दोघे जाूणन होते. चार्लीला सारखी आठवण येई की आपले वडील अतिरिक्त मद्यपानाने गेले त्यामुळे तो फार बेचैन असे. तो मुलांना नेहमी सल्ला देत असे. समजावीत असे.

चार्लीने 'लाईम टाईम' चित्रपट तयार केला आणि त्यात आपल्या मुलाला, चार्लसला एक छोटा रोल दिला. त्यावेळी चार्लसचं वय होतं सव्वीस आणि चार्लीचं वय त्रेसष्ट. परंतु नवनवीन प्रयोग करण्याची त्याची उमेद आणि जिद्द अगदी वाखाणण्याजोगी होती. तो म्हणत असे की आयुष्य थोडे असते आणि कलेला सीमाच नसते. चार्लीचं बोलणं ऐकून त्याचा मुलगा चार्लस शरमिंदा होई आणि व्यसन सोडण्याचा निश्चय करीत असे 'लाईम लाईट' चित्रपट खूप चालला. पहिला शो झाल्यावर लोकांनी चार्लीला दोन शब्द बोलायला सांगितले. चार्ली म्हणाला, ''तुम्ही साऱ्या जगाने मला भरभरुन प्रेम दिले. मी तुमचा फार ऋणी आहे.' त्यावर एक स्त्री ताडकन उठून म्हणाली, ''नाही नाही आम्हीच तुमचे फार ऋणी आहोत. आम्हीच तुमचे

आभारी आहोत. तुम्ही आम्हाला भरभरुन हसू दिलंत." त्या दिवशीच्या कार्यक्रमाने सारेच भारावून गेले. चार्लीवर लोक खूप प्रेम करीत होते. तरीही अमेरिकेने त्याला भरपूर मनस्ताप दिला होता.

ऊनाच्या सल्ल्यानुसार चार्लीने युरोप टूरला जायचे ठरविले. त्यापुर्वी अमेरिकेतील सर्व हिशोब, टॅक्सेस, देणे पूर्ण केले. लंडनला जाऊन तेथेच कुठेतरी स्थायिक व्हायचे विचार त्याच्या मनात घोळत होते. ऊनाच्या समजूतदार साथीने चार्लीला फार समाधान वाटत होते. अमेरिकेत पुन:प्रवेश घेण्यासाठी त्याला अनेक प्रश्नोत्तरांना सामोरे जावे लागले होते. त्याला अखेर परवाना मिळाला पण त्यापूर्वीच त्याने अमेरिकेत परत न यायचे ठरविलें होते.

## जन्मभूमीकडे परत :

चार्ली तात्पुरता इंग्लंडला जात आहे असे सर्वांना वाटत होते. त्याच्या निरोपसमारंभासाठी छोटेखानी पार्टी आयेजित करवली होती. त्यापार्टीत त्याने इतके सफाईदार नृत्य केले की सारेच थक्क झाले. त्याची दोन्ही मुले चार्लस आणि सिडने तर अवाक् झाली. लोकांनी टाळ्यांचा गजर केला. पार्टीतील सर्वांचा त्यांनी हार्दिक निरोप घेतला. इतर कुणाला नाही तरी त्याला माहित होते की तो परत येणार नाही. अमेरिकेने त्याच्यावर खुप प्रेम केले होते. त्याने तेथे राहून प्रचंड नावलौकिक आणि अफाट संपत्ती मिळवली होती. नंतर मात्र उगाचच त्याला कम्युनिस्ट ठरवून त्याचा दुस्वास केला होता. तरीही अमेरिकेच्या विरहाने त्याचे मन हेलावून गेले. तेथील लोकांना तो विसरु शकणार नव्हता. त्यांच्याबद्दल त्याच्या मनात अपार कृतज्ञता होती.

चार्ली कुटूंब बोटीने इंग्लंडला निघालं. ऊना, मुले चार्लस, सिडने आणि ऊनापासून झालेली आठ मुले. सारं खुशीत होते. चार्ली आणि ऊना अमेरिकेतल्या त्यांच्या अलिशान घराच्या, तेथे वर्षानुवर्षे काम करणाऱ्या नोकर वर्गाच्या आठवणीने गलबलून गेले होते. मुले खेळत होती. खेळून आल्यावर सर्वजण दमली. साऱ्यांनीच जेवणाचा आस्वाद घेतला.

बोट इंग्लंडला किनाऱ्याला लागली. चार्लीच्या स्वागतासाठी प्रचंड जनसमुदाय जमला होता. ऊनाला इंग्लंड आवडले आणि ते ऐकून चार्ली खुष झाला पण ऊना म्हणाली की, ''इंग्लंड आवडले नसते तरी जिथे तुला आनंद मिळतो तेथे मला नक्कीच आनंद मिळाला असता.' ती म्हणाली ''मी सावलीसारखी तुझ्या बरोबर राहिन. माझ्या मायभूमीचे बंध तुटले आहेत

पण तुझ्याशी न तुटणारे नवे बंध बांधले गेले आहेत.'' चार्लीला तिच्या बोलण्याने अपार समाधान मिळाले. त्याला मनोमन खात्री झाली की हे रेशमी बंध आता कधीही तुटणार नाहीत.

चार्लीने ऊनाला लंडनमधले आपले जुने घर, तेथे काढलेले दिवस, आईचे वेड साऱ्या आठवणी सांगितल्या. माझ्या कलेची मुहूर्तमेढ इथेच रोवली गेली हे ही सांगितले. चार्ली विचारात गढून गेला.

चार्लीचा 'लाईम लाईट' अमेरिकेत खूप चालला होता. लब्धप्रतिष्ठांवर त्याने कोरडे ओढले. इंग्लंडमध्येही तो खूप चालला मध्यंतरी ऊना अमेरिकेत जाऊन मालमत्तेची आवराआवर करुन लगेचच विमानाने परत आली. चार्ली कुटूंब स्वित्झर्लंडमधल्या कॉरसिअर या गावी स्थायिक झाले. 'मनोर दा बॉ' हे प्रचंड घर त्यांनी खरेदी केले. चार्ली करोडो डॉलर्सचा मालक होता. चार्ली कुटूंबाला पिढ्यानपिढ्या मानाने जगता आले पीहजे असे तो नेहमी म्हणे. मुलांना चांगल्या शाळा मिळाल्या होत्या आणि ते छान अभ्यास करीत होते. त्यांना मित्रमंडळीही मिळाली होती. घराच्या प्रचंड बागेतही चेरी, सफरचंद, पिअर्स, अलुबुखार, स्ट्रॉबेरी सारे विपुल प्रमाणात येत होती आणि मुले आपल्या मित्रांना वाटत होती. येशूनेच या निवांत, सुंदर निसर्गरम्य घरात आपल्याला आणून ठेवले अशी चार्लीची खात्री होती. मुलं शाळेतुन घरी यायच्या वेळी ऊना आणि चार्ली व्हरांड्यात गप्पा मारीत बसत. ते आल्यावर शाळेतल्या हकीकती मुले सांगत असत व गप्पा रंगत असत. चार्ली घरातच मुलांमध्ये रंगला होता. त्याची मोठी मुले चार्लस आणि सिडने सॅनफ्रान्सिस्कोत रहात होती. चित्रपटात भूमिका करीत होती. त्याचा भाऊ सिडने ही अमेरिका सोडून युरोपात आला होता आणि आपल्या पत्नीबरोबर सुखाने रहात होता. सिडने चार्लीचा मोठा भाऊ. त्याच्यापेक्षा चार वर्षांनी मोठा. परंतु सिडने चार्लीच्या आयुष्यात नेहमी त्याच्यामागे उभा राहिला.

सिडनेनेच त्याला अभिनयाच्या जगात आणले. त्याला नेहमीच भरभक्कम आधार दिला. आईची आणि चार्लीची सर्वतोपरी काळजी घेतली. १६ एप्रिल १९६५ ला सिडनेचा अंत झाला. सिडने नसता तर चार्ली, चार्ली झाला असता कां कोण जाणे ?

चार्लीकडे मित्रमंडळी येत जात होती. एकदा तर चीनचे चौ एन लाय पण त्याच्याकडे आले होते. चार्लीच्या मनात चित्रपटासाठी नवनवीन विषय घोळत होते. त्याला नेपोलियनवर चित्रपट बनवायचा होता. आणि आईने अनेकदा व्यक्त केलेल्या इच्छेनुसार येशूवर चित्रपट बनवून विश्वबंधूत्वाचा संदेश गावोगाव पोहोचवायचा होता. गरीबांच्या दुःखावर फुंकर घालायची होती. ऊनाला हिरॉईन बनण्याची कधीच इच्छा नव्हती. ती आदर्श गृहिणी आणि आदर्श माता होती. चार्लीच्या संसाराची विस्कटलेली घडी तिने नीट बसवली होती. दिवस अतिशय सुखाने जात होते.

## चार्लीची अखेर :

चार्ली आता अठ्ठ्याऐंशी वर्षाचा झाला होता. सरत्या आयुष्याची जाणीव त्याला व्हायला लागली होती. आईची आठवण म्हणून येशूवरचा चित्रपट करायचा होता. त्याला वाटत असे की आपले वडील थेट नेपोलियन सारखे रुबाबदार दिसतात. नेपोलियन वरचा चित्रपट आपल्या वडीलांच्या आठवणीसाठी काढायलाच पाहिजे. परंतु आता त्याला कळून चुकले होते की आयुष्याच्या चित्रपटाचा शेवट जवळ आला आहे. आता तो व्हीलचेअरला जखडला गेला होता. त्याला सर किताब मिळाला होता ऑस्कर ही मिळालं होतं. त्याचं कार्य अजरामर झाले होते. त्याला अजूनही खूप करायचे होते पण शरीर साथ देत नव्हते. शेवटी आयुष्य अपुरे पडते. आयुष्यातले आशा निराशेचे, प्रेम वियोगाचे, दारिद्र्याचे, वैभवाचे, मानापनाचे, सुखदु:खाचे सारे प्रसंग त्याने अनुभवले होते. कणखर मनाने अनुभवले होते परंतु आता शरीर हारत चालले होते. थकत चालले होते. त्या दिवशी सर्व मुले ट्रीपला गेली होती. चार्लीने त्यांना लवकर परत यायला सांगितले होते. याप्रमाणे मुले आलीही.

चार्लीचे सर्व शरीर विकलांग झाले होते. त्याच दिवशी त्याला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. हॉस्पिटलमध्ये त्याला व्हिलचेअरवर हिंडायची लहर येई. मुले आणि ऊना त्याला दररोज भेटायला जात. पण आता त्याला स्मृतिभ्रंश आणि दृष्टिभ्रंश होत चालला होता. बसल्याजागी होता. बसल्याजागी हातपाय थरथरु लागले होते. मुलांनाही नीटपणे तो ओळखेनासा झाला. ऊना त्याच्याजवळ अहोरात्र बसून रहायची.

आणि एके दिवशी ब्रेकफास्ट घेतांना तो ऊनाला म्हणाला की मला स्वप्न पडले की एक पंख लावलेला कलाकार नाचत आला. तो आता आकाशात झेप घेणार असे वाटले पण तो खाली असलेल्या दरीतच कोसळला. त्याचे स्वप्न ऐकून ऊना हादरली. पुन्हा तो म्हणाला. आज ख्रिसमस डे. लक्षात आहे ना मला आईसाठी येशूवर फिल्म करायचीच आहे. मला झोप येतेय. पांघरुण घालतेस २५/१२/१९७७ सालचा तो ख्रिसमस दिवस होता.

ऊनाने त्याच्या अंगावर चादर घातली. डॉक्टर तपासायला आले. पण चार्लीला गाढ निद्रा लागली होती. डॉक्टरांनी तपासले. दररोजच त्याच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी आलेल्या प्रचंड जनसमूहाला डॉक्टरांनी सांगितले. चार्ली चॅप्लीन शांतपणाने आपल्यातून निघून गेले आहेत.

आपल्या आयुष्यभर स्वप्ने रंगवणारा, स्वप्ने जगणारा, स्वप्ने प्रत्यक्षात आणणारा विनोदसम्राट अखेर काळाच्या पडद्याआड गेला होता.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बालवाङमय विभाग
दा. क्र. ४४००   दिनांक ९।१।५।०८
विषय बा. वा. ...क्र.

BVBK-0404400

BVBK-0404400